**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

**प्रेसनोट** दिनांक:- १५/१२/२०१८

# नामपुर, ता.सटाणा येथील घरफोडीचा गुन्हा उघडकीस - घरफोडया करणारे आंतरजिल्हा टोळीस अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

---

दिनांक २०/११/२०१८ रोजी सटाणा तालुक्यातील नामपुर शिवारात भरदिवसा घरफोडीचा प्रकार घडला होता. नामपुर येथील सेवानिवृत्त कर्मचारी श्री.कारभारी भाउराव मोरे हे त्यांचे कुटूंबीयांसह दि.२२ नोव्हेंबर २०१८ रोजी सकाळी सप्तश्रृंगी गडावर दर्शनासाठी गेले होते. दरम्यान दुपारचे सुमारास त्यांचे बंद घरावर पाळत ठेवुन अज्ञात आरोपीतांनी दरवाजाचा कडी कोयंडा तोडुन आत प्रवेश करून कपाटात ठेवलेले सोन्या-चांदिचे दागिने व रोख रूपये असा एकुण ३,८३,३००/- रू. किंमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून चोरून नेला होता. सदर बाबत **जायखेडा पोलीस ठाणेस I गुन्हा रजि.नं. २०७/२०१८ भादवि कलम ४५४,३८०** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. जिल्हयातील वाढत्या घरफोडया व चोरीचे गुन्हयांना प्रतिबंध होणेसाठी **मा.पोलीस अधीक्षक श्री.संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. नीलोत्पल सो** यांनी सराईत गुन्हेगारांचा शोध घेणेसाठी मार्गदर्शन करून गुन्हे उघउकीस आणणेसाठी सुचना दिलेल्या आहे. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांचे पथकाने जायखेडा पोलीस ठाणेस दाखल असलेले घरफोडीचे गुन्हयांचा समांतर तपास सुरु केला.

सटाणा तालुका परिसरातील बंद घरांवर पाळत ठेवुन घरफोडी करणारे गुन्हेगारांची गुन्हा करण्याची पध्दत व सी.सी.टी.व्ही. फुटेजची पडताळणी करून स्थागुशाचे पथकाने मिळविलेल्या गुप्त माहितीचे आधारे सराईत गुन्हेगार हे लगतचे जिल्हयातील असल्याचे खात्रीशीररित्या समजले. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांनी तपास पथक तयार करून धुळे जिल्हयात रवाना केले, धुळे शहरातील आझादनगर व आंबिकानगर परिसरात स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी ०२ दिवसांपासुन तळ ठोकुन होते. दरम्यान धुळे शहरातील तिरंगा चौक परिसरात सापळा रचुन घरफोडया करणारा **सराईत गुन्हेगार नामे १) अकबर मुस्तकीम बागवान,** वय ३०, रा. तिरंगा चौक, ८० फुटी रोड, धुळे यास शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले आरोपीस विश्वासात घेवुन चौकशी केली असता, त्याने त्याचे साथीदार नामे **२) अस्लम शेख इस्माईल खाटीक उर्फ लाली,** वय ३२, रा. आंबिकानगर, डी.डी.आर.सी. हॉटेलजवळ, धुळे, **३) मोसीन इस्माईल बागवान उर्फ दालचावल,** वय ३२, रा. आझादनगर, मारूतीमंदिराजवळ, धुळे यांचेसह गेल्या २० ते २५ दिवसांपुर्वी सटाणा तालुक्यातील नामपुर शहरात मोटर सायकलवर जावुन, एका बंद घरावर पाळत ठेवुन घरफोडी करून सोन्या-चांदिचे दागिने व रोख चोरी केले असल्याची कबुली दिली आहे. ताब्यात घेतलेले आरोपीचे साथीदार **अस्लम उर्फ लाली व मोसीन उर्फ दालचावल** यांना धुळे शहरातील **आझादनगर परिसरातुन ताब्यात** घेण्यात आले आहे.

ताब्यात घेतलेले आरोपीतांचे कब्जातुन वरील घरफोडीचे गुन्हयातील **१,३३,४५५/- रूपये किंमतीचे ०५ तोळे सोनं**, तसेच गुन्हयात वापरलेली **हिरो एच.एफ.डिलक्स मोटर सायकल** व **०४ मोबाईल** फोन असा **एकुण १ लाख ६१ हजार ४५५ रूपये** किंमतीचा **मुद्देमाल हस्तगत** करण्यात आलेला आहे. वरील तीनही आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन त्यांचेविरूध्द धुळे जिल्हयातील शिरपुर व धुळे शहरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये घरफोडी व चोरीचे गुन्हे दाखल आहे. सदर आरोपी हे बंद घरांवर पाळत ठेवुन घरफोडया करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले असुन त्यांचेकडुन अजुन काही घरफोडीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी केलेले मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे**, सपोनि **श्री. राम कर्पे**, पोहवा दिपक आहिरे, नामदेव खैरणार, अशोक जगताप, पुंडलीक राउत, पोना अमोल घुगे, पोकॉ प्रदिप बहिरम, गणेश पवार, हेमंत गिलबिले, चालक पोना बापु चौधरी यांचे पथकाने धुळे जिल्हयातुन सदर आरोपीतांना ताब्यात घेतले असुन नामपुर येथील घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणलेले आहे.